कार्याआदेश

जा.क्र.राजिप/सकवि/वशी-५/२००९-१०/ १४१
समाज कल्याण विभाग,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.
दिनांक:-२३ /०२/२०१०.

प्रति,

मे. युनिव्हर्सल ट्रेडिंग कंपनी,
अे-३, संध्यारंग को.ऑ. हौ.सो.
आग्रा रोड, कल्याण (पश्चिम)
कल्याण, जि.ठाणे.

सन २००९-१० मध्ये २०% जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी घरघंटी पुरविणेची योजना कार्यान्वित करणेंत आलेली आहे. याबाबत प्राप्त निविदेमध्ये मे. युनिव्हर्सल ट्रेडिंग कंपनी, कल्याण यांचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्यामुळे (प्रति नग १५,६५०/- अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार सहाशे पन्नास मात्र) आपली निविदा वित्त विभागामार्फत मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी मंजूर केलेली आहे. सदर मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी घरघंटी पुरविणेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) मोटार २ एच. पी. सिंगल फेज (आय. एस. आय. मार्क) २) चक्की साईज १४ इंच. ३) दगड साईज १२ इंच X ३ इंच.(कुरुड दगड ७५ मी.मी ) ४) वर्क ट्रॉली पटटा व पुली.५) लोखंडी अँगलचे स्टँड व्हिलसह बॉडीसाठी वापरण्यात आलेले अँगल चांगल्या प्रतिचे असावेत.

आपण निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी - शर्तीनुसार करारनामा करुन दिलेला आहे. त्यामुळे निविदेमध्ये नमुद केलेल्या तपशीलानुसार एकूण ४१ घरघंटीचा पुरवठा खाली दर्शविलेल्या यादीप्रमाणे संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडे पुरवठा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत पुरवठा सुस्थितीत करावयाचा आहे. तसेच त्याच्या पोहोच पावत्या व पुरवठा बील दोन प्रतित या कार्यालयाकडे देण्यांत यावे.

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | पुरवठा करावयाच्या घरघंटीची संख्या |
|---|---|---|
| १ | अलिबाग | ०६ |
| २ | पेण | ०१ |
| ३ | पनवेल | ०१ |
| ४ | उरण | -- |
| ५ | कर्जत | १० |
| ६ | खालापूर | ०१ |
| ७ | सुधागड | ०२ |
| ८ | रोहा | ०३ |
| ९ | मुरुड | ०१ |
| १० | तळा | ०१ |
| ११ | माणगांव | ०५ |
| १२ | महाड | ०२ |
| १३ | पोलादपूर | ०२ |
| १४ | म्हसळा | -- |
| १५ | श्रीवर्धन | ०६ |
| एकूण:- ( [illegible] ) | | ४१ |

समाज कल्याण अधिकारी, गट - अ
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

५) मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.

६) संगणक कक्ष प्रमुख , रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना रायगड जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळी (वेबसाईट) ...........प्रसिध्दीसाठी.

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांचेकडे माहितीसाठी रवाना.

२/- वरील आदेशान्वये मंजूर केलेल्या घरघंटीचा पुरवठा (आदेशामध्ये नमुद केलेल्या तपशीलानुसार )आपल्या ताब्यात घ्यावा व संबंधित ग्रामपंचायतींना त्वरित वाटप करुन पोहोच पावती व उपयोगिता दाखला या कार्यालयाकडे पाठविणेंत यावा.

समाज कल्याण अधिकारी, गट - अ
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.